# ROTARY CLUB OF KOLHAPUR CENTRAL NEWS

RI DISTRICT 3170 | CLUB NO. : 15656 | CHARTER NO. : 15656 | ESTD ON : 13.05.1978

## MONTHLY BULLETIN FEBRUARY-MARCH 2025



**Rtn. Stephanie Urchick**
Rotary International President



**Rtn. Sharad Pai**
District Governor (RID 3170)



**Rtn. Sanjay Bhagat**
Club President



**Rtn. Rahul Kulkarni**
Asst. Governer



**Rtn. Ravindra Khot**
Secretory



**Rtn. Nilesh Patil**
Treasurer

**ISSUE No. 01**
**PUBLISH DATE : 1 Apr. 2025**

**Bulletin Editor :**
Rtn. Rohanraj Shinde
Rtn. Abhay Sonavane

On Monday, 24th February, in celebration of the 120th anniversary of the Rotary Foundation, the " Rotary Club of Kolhapur Central, in collaboration with  Lotus Medical Foundation, organized a Free health camp at Hanumannagar Shiye. The camp offered various medical services, including blood tests, eye tests, blood pressure monitoring, and ECG examinations. Additionally, glasses were provided at discounted rates to those in need. The event received special support from Mitra Mandal Hanumannagar Shiye, contributing to its success.






फेब्रुवारी २०२५ या महिन्याची BOD दिनांक ६ मार्च रोजी कलेक्टर ऑफिस कॅन्टीन येथे सकाळी घेण्यात आली BOD मधील विषय खालीलप्रमाणे. १) मागील BOD मधील विषय वाचून दाखवले.२) फेब्रुवारी महिन्यात झालेल्या प्रोजेक्ट ची माहिती खालीलप्रमाणे. ३) ३१ जानेवारी,१ आणि २ फेब्रुवारी रोजी बेळगांव मध्ये पार पडलेल्या रोटरी ची डिस्ट्रिक्ट ३१७० ची डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स पार पडली. रोटरी सेंट्रल चे २१ मेंबर या कॉन्फरन्स मध्ये सहभागी झाले. खूपच सुंदर आणि आकर्षक, उत्साहवर्धक पद्धतीने कॉन्फरन्स चें नियोजन केले होते. स्पीकर्स खूप चांगले होते.दोन दिवस संध्याकाळची फेलोशिप खूपच म्युझिक आणि आनंदाने भरलेली होती. ४) २४ फेब्रुवारी रोजी १२० व्या रोटरी फाउंडेशन चे निमित्ताने हनुमान नगर, शिये, येथे रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल यांच्या वतीने व अचानक मित्र मंडळ यांच्या सहकार्याने सर्व नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरा मध्ये सर्व प्रकारच्या रक्त तपासणी, बल्ड प्रेशर, ECG, डोळे तपसणी, व सवलतीच्या दराने चष्मे वाटप करण्यात आले.या शिबिराचा २०० नागरिकांनी लाभ घेतला. शिबिराचा मोठा फायदा हा झाला की एक HIV positive रुग्ण आढळला. त्यालातातडीने पुढील तपासणीसाठी पाठविण्यात आले व त्यांच्या कुटुंबाची ही तपासणी करण्यात आली. ५) २ मार्च रोजी आनंद भवन,सायबर कॉलेज येथे घेण्यात येनाऱ्या महाराष्ट्राची गौरवगाथा या कार्यक्रमाची तयरी करण्यात आली.

Rotary Central Provides Support to Educational and Social Institutions. The Rotary Club of Kolhapur Central extended support to various educational and social organizations using the funds raised from the "Maharashtrachi Gauravgatha" program, which was organized by the club on March 2. During the event, letters of assistance were distributed to all these institutions by the donors present in the audience. The assistance provided included the installation of an RO unit for clean water at the Sub-District Hospital in Gandhinagar, the supply of daily food for students at the Children's Welfare Complex and Umed Maya's House, and an RO unit for the Ashram School in Kusire. Additionally, educational materials were distributed to Vidya Mandir Baleghol School, and financial support was provided to Prakash Gaikwad, a snake charmer. All the attendees appreciated the efforts of Rotary Central for delivering this support during the event itself. The program also featured vibrant dance performances showcasing Maharashtra's rich cultural heritage, which won the admiration of the audience. On this occasion, Rotary Central effectively communicated its commitment to social responsibility. In his opening remarks, Club President Rtn. Sanjay Bhagat provided an overview of the club's various activities. The event was attended by several Rotarians, including Event Chairman Rtn. R.Y. Patil, Club Community Director Rtn. Dr. Mahadev Narke, Secretary Rtn. Ravi Khot, Treasurer Rtn. Nilesh Patil, Rtn. Sandeep Salokhe, Rtn. Avinash Chiknis, and Rtn. Vishal Patil. Distinguished guests included Electronica Finance Maharashtra Head Mr. Sagar Chowgale, Union Bank of India Deputy General Manager Mr. Sanjay Kumar Mandal, Mr. Sharan Baswa, Mr. Gurpreet Singh, Mr. Adinath Tandale, Kolhapur Urban Bank Director Mr. Vishwas Katkar, Mr. Rajan Gune of My Hyundai, Southern Regional President of Rayat Shikshan Sanstha Rtn. M.B. Sheikh, Ex-Provincial Rtn. Raju Bhai Doshi, and Rtn. Srinivasa Malu. The event highlighted Rotary Central's dedication to social causes and its ongoing efforts to support the community.






लोकमत

रोटरी सेंट्रलकडून शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांना मदतीचे पत्र देताना क्लबचे अध्यक्ष संजय भगत, आर. वाय. पाटील, डॉ. महादेव नरके, रवी खोत, नीलेश पाटील, अविनाश चिकणीस, संदीप साळोखे, आदी उपस्थित होते.

## 'रोटरी'च्यावतीने संस्थांना मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

शिरोली : रोटरी क्लब कोल्हापूर सेंट्रलच्या वतीने विविध शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांना मदत देण्यात आली. क्लबच्या वतीने आयोजित 'महाराष्ट्राची गौरवगाथा' या कार्यक्रमातून जमलेल्या आर्थिक निधीतून या सर्व संस्थांना उपस्थित देणगीदार प्रेक्षकांच्या हस्ते मदत पत्र देण्यात आली.

यामध्ये गांधीनगर येथील उपजिल्हा रुग्णालयासाठी स्वच्छ पाण्यासाठी आर.ओ. युनिट, बालकल्याण संकुल, उमेद मायेचं घर या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी दैनंदिन जेवणाचे साहित्य, कुशिरे येथील आश्रमशाळेसाठी आर.ओ. युनिट, विद्या मंदिर बाळेघोल शाळेला शैक्षणिक साहित्य, प्रकाश गायकवाड या सर्पमित्राला मदत असे उपक्रम राबविले. कार्यक्रमाच्या दिवशीच ही मदत केली.

'महाराष्ट्राची गौरवगाथा'तून जमलेल्या निधीतून दिली मदत पत्रे.

सेंट्रलचे प्रेसिडेंट संजय भगत यांनी प्रास्ताविक केले यावेळी इव्हेंट अध्यक्ष आर. वाय. पाटील, क्लब कम्युनिटी डायरेक्टर डॉ. महादेव नरके, सेक्रेटरी रवी खोत, ट्रेझरर नीलेश पाटील, संदीप साळोखे, अविनाश चिकनिस, विशाल पाटील, रोटरीयन, सागर चौगले, युनियन बँक ऑफ इंडियाचे उपसरव्यवस्थापक संजय कुमार मंडल, शरण बसवा, गुरप्रीत सिंग, आदिनाथ तांदळे, विश्वास काटकर, राजन गुणे, एम. बी. शेख, माजी प्रांतपाल राजू भाई दोशी, श्रीनिवास मालू उपस्थित होते.



तरुण भारत

## जिल्ह्यातील विविध शैक्षणिक, सामाजिक संस्थांना मदत

उद्योजक संजय भगत, डॉ. महादेव नरके यांचे विशेष प्रयत्न



पुण्य नगरी

## 'रोटरी सेंट्रल'कडून सामाजिक संस्थांना मदत

































On behalf of the Rotary Club of Kolhapur Central, Dr. Deepa Firkhe was invited as a guest for the weekly meeting on March 10th, on the occasion of International Women's Day on March 8th. In the current situation, the number of people affected by cancer is increasing, with a higher proportion of women being affected. Therefore, the topic of the meeting was "Precautions to Prevent Cancer." Dr. Deepa Firkhe gave a detailed presentation and provided valuable guidance on this subject. During the session, all the attending members and Anns raised their questions, which Dr. Firkhe answered to their satisfaction. In today's fast-paced lifestyle, Dr. Deepa Firkhe shared highly useful and informative insights.







पास्ट प्रेसिडेंट आर. वाय. पाटील यांचा पन्नासावा वाढदिवस साजरा केला.



रो.चंद्रकांत थोरात सर आणि रो.राहुल माने याना वाढदिवसाच्या शुभेच्छा



रो.सागर चौगले सर लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा
















सकाळ

**गोधडीनिर्मिती कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद**

घुणकीत आयोजन : रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रलचे सहकार्य

सकाळ वृत्तसेवा

घुणकी, ता. १६ : रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल आणि सकाळ तनिष्का व्यासपीठ यांच्यातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त गोधडीनिर्मिती कार्यशाळा झाली. संस्कार शिदोरीच्या प्रमुख स्मिता खामकर व अर्चना पाटील यांनी १०० हून अधिक महिलांना गोधडीचे प्रशिक्षण दिले.

घुणकीच्या सरपंच सुजाता जाधव म्हणाल्या, 'आपली संस्कृती जपणे

घुणकी : रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल आणि सकाळ तनिष्का व्यासपीठ यांच्यातर्फे आयोजित गोधडीनिर्मिती कार्यशाळेत सहभागी महिला.



The Rotary Club of Kolhapur Central and Sakal Tanishka Platform jointly organized a Godhadi (quilting) workshop at Ghunki (Taluka Hatkanangale). Smita Khamkar, head of Sanskar Shidori, and Vaishali Patil provided training to over 100 women during the workshop. Club President Rtn.Sanjay Bhagat shared insights about the work of Rotary, emphasizing that Rotary Central actively supports women's empowerment. He also appreciated the ongoing initiatives by the Sakal Tanishka Platform aimed at empowering women. During the event, Sujata Jadhav the Sarpanch of Ghunki, highlighted the importance of preserving cultural heritage and encouraged women to contribute to this effort. She noted that the Godhadi training has opened new opportunities for financial independence for women. Community Service Director of Rotary Central Rtn.Dr. Mahadev Narke remarked that empowering women strengthens both the household and society. He praised the collaborative effort between Sakal and Rotary Central, recognizing its unique impact. The event was attended by Event Chair Rtn.Naresh Shingade, Ann.Sanyogita Bhagat, and Ann. Vaishali Shingade. The workshop was coordinated by Neelam Deshmukh and Sushant Patole from Sakal Tanishka.



सर्प मित्र श्री प्रकाश गायकवाड याना सर्प पकडत असताना कोणता सर्प आहे याचा अंदाज न आल्यामुळे व इमर्जन्सी कॉल आल्यामुळे सेफ्टी किट उपलब्ध नसल्यामुळे घोणस जातीच्या सर्पा ने दंश केल्यामुळे त्याचा एक हात पूर्ण बाधित झाला.त्यामुळे त्याचे उत्पन्नाचे साधन थांबले व हॉस्पिटल चा खर्च ही करावा लागला.समाजातून ही त्याला औषध उपचारासाठी मदत झाली .रोटरी क्लब ऑफ कोल्हापुर सेंट्रल नेही त्याला एक महिन्याच्या कौटुंबिक खर्चाइतकी रक्कम देवून सर्प मित्राप्रति सामाजिक बांधिलकी जपण्याचा छोटासा प्रयत्न केला.

कोल्हापूर सेंट्रल बस स्टँड वरती खाजगी बसेस ना पॅसेंजर बोलवण्याचं काम करणारा लखन याच्याविषयी माहिती मिळाल्यावर रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल च्या वतीने आम्ही त्याची भेट घेतली. त्यावेळी त्याची स्टोरी खूपच दु:खदायक होती की जो मुलगा एकेकाळी उत्कृष्ट बॉडी बिल्डर होता आणि त्याला ब्रेनस्ट्रोक झाल्यामुळे त्याच्या आयुष्यात पाहिलेल्या सर्व स्वप्नांचा भंग झाला आणि दीड वर्षाची मुलगी असणारा संसार ही कोलमडून पडण्याची वेळ आली असताना न डगमगता ब्रेनस्ट्रोक मुळे सरळ बोलता येत नसताना ,ऊन सहन होत नसताना,चालताना तोल जात असताना तरीही खाजगी बसेस साठी ओरडून पॅसेंजर गोळा करण्याच काम करून संसार आणि स्वत:चा औषधांचा खर्च भागवण्याचा ज्या जिद्दीन प्रयत्न करतोय त्याला तोड नाही. त्यामुळं रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल कडून त्याला सहा महिन्याचा औषधांच्या खर्चाची मदत करण्यात आली. यावेळी प्रेसिडेंट रो.संजय भगत,रो.डॉ.महादेव नरके सर,रो.रोहनराज शिंदे,रो.नरेश शिंगाडे,सेक्रेटरी रो.रवींद्र खोत व नागरीक उपस्थित होते.



## Rotary Central Harmony Rotary Premier League: Chemist Team Claims Victory, Smack Team Finishes as Runners-Up.

The **Harmony Rotary Premier League 2025**, organized by the **Rotary Club of Kolhapur Central,** was successfully held on **March 21, 22, and 23 at Merry Weather Ground.** A total of 12 association teams from Kolhapur participated in this thrilling cricket tournament.

The tournament was inaugurated by **Chhatrapati Sambhajiraje, President of the Kolhapur District Cricket Association**. The final match was a fierce contest between Smack Association and Chemist Association, where the Chemist team emerged victorious after an intense game.

**Outstanding Performers of the Tournament:** -

**Ranajit Mane (Smack Team)** – Awarded **Player of the Tournament and Best Batsman**

**- Avdhut Patil (Chemist Team)** – Awarded **Best Bowler**

-**Devendra Rajput (Chemist Team)** – Awarded **Man of the Match** for the final

The prize distribution ceremony was conducted by **Rtn. Raju Doshi (Past District Governor), Rtn. Sanjay Shete (President, Chamber of Commerce), Rtn. Badam Patil (Treasurer, Smack Team), Rtn. Shekhar Kusale (Director), Rtn. Sanjay Bhagat (President, Rotary Central), Rtn. Abhijit Bhonsle (Event Chairman), and Rtn. Nilesh Patil (Co-Chairman).**

In the **final match,** Smack Team batted first and **scored 74 runs in 8 overs,** with **Sahil Jaiswal contributing 27 runs.** In response, **Chemist Association Team** chased down the target, led by **Devendra Rajput (25 runs)** and **Ajinkya Khade (20 runs).** With **7 runs needed from the last 2 balls, Ajinkya Khade smashed a six,** securing the championship for his team. The event was anchored by **Sandeep Salokhe**. Present at the tournament were Rtn. Ravindra Khot (Club Secretary), **Rtn. Vinod Kamboj, Rtn. R.Y. Patil, Rtn. Sanjay Kadam, Rtn. Dr. Mahadev Narke, Rtn. Raviraj Shinde, and Rtn. Sanjay Salokhe,** along with other Rotarians and players.

**Rtn Dajiba Patil , Proprietor of P.N.Distributor, supported this event being a Title Sponsor.** The successful execution of the tournament was made possible through the dedicated efforts of **Rtn. Abhijit Bhonsle (Event Chairman), Rtn. Nilesh Patil (Co-Chairman), and all Rotary Central members.**



तरुण भारत

**रोटरी सेंट्रल हार्मनी स्पर्धेत केमिस्ट संघाला विजेतेपद, स्मॅक उपविजेता**

वार्ताहर
पुलाची शिरोली

उद्योजक संजय भगत यांच्या पुढाकाराने रोटरी क्लब कोल्हापूर सेंट्रलच्या वतीने आयोजित हार्मनी रोटरी प्रीमियर लीग २०२५ या क्रिकेट स्पर्धेत केमिस्ट असोशिएशन संघाने अत्यंत चुरशीच्या लढतीत स्मॅक संघावर मात करून विजेतेपद मिळवले.

स्मॅक संघाचा रणजित माने मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज, केमिस्ट संघाचा अवधूत पाटील उत्कृष्ट गोलंदाज तर देवेंद्र रजपूत अंतिम सामन्यातील सामनावीर ठरला. माजी प्रांतपाल राजू दोशी, चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे, स्मॅकचे खजानीस बदाम पाटील, संचालक शेखर कुसाळे, सेंट्रलचे अध्यक्ष संजय भगत, इव्हेंट चेअरमन अभिजित भोसले, नीलेश पाटील यांच्या हस्ते बक्षिसे दिली.

**कोल्हापूर : येथे हार्मनी स्पर्धेतील विजेतेपद मिळवणाऱ्या केमिस्ट असोसिएशन संघाला बक्षीस देताना माजी प्रांतपाल राजू दोशी, सोबत चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे, स्मॅकचे, खजानीस बदाम पाटील आदी.**

या स्पर्धेमध्ये निमंत्रित १२ संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना स्मॅक संघाने आठ षटकात ७४ धावा केल्या. साहिल जैस्वालने २७ धावा केल्या. उत्तरादाखल खेळताना केमिस्ट् असोसिएशनच्या संघाने देवेंद्र राजपूत २५ धावा, अजिंक्य खाडेच्या २० धावांच्या जोरावर संघाला विजेतेपद मिळवून दिले. अखेरच्या दोन चेंडूत जिंकण्यासाठी सात धावांची गरज असताना अजिंक्य खाडेने षटकार मारत संघाला विजेतेपद मिळवून दिले. सूत्रसंचालन संदीप साळोखे यांनी केले. यावेळी क्लब सेक्रेटरी रवींद्र खोत, विनोद कांबोज, आर. वाय. पाटील, संजय कदम, डॉ. महादेव नरके, रविराज शिंदे, संजय साळोखे यांच्यासह रोटेरियन होते.















लोकमत

**'रोटरी'कडून गांधीनगर वसाहत रुग्णालयाला वॉटर फिल्टर**

लोकमत न्यूज नेटवर्क

**गांधीनगर** : जागतिक जलदिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल यांच्या वतीने गांधीनगर येथील वसाहत रुग्णालयास आरओ वॉटर फिल्टरचे दोन युनिट देण्यात आले.

यावेळी रोटरीचे कम्युनिटी संचालक डॉ. महादेव नरके यांनी रोटरी क्लबचा १२० वर्षांचा इतिहास विशद केला. वसाहत रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दिलीप वाडकर यांनी रोटरीने आजपर्यंत केलेल्या समाजकार्याचे कौतुक करताना चांगली रुग्णसेवा देऊन त्यांच्या सहकार्याची परतफेड करण्याची ग्वाही दिली. असिस्टंट गव्हर्नर राहुल कुलकर्णी यांनी सांगितले की, समाजाला गरज असेल तिथे रोटरी क्लब मदतीसाठी तयार आहे. आरओचे उद्घाटन असिस्टंट गव्हर्नर राहुल कुलकर्णी, अध्यक्ष संजय भगत यांच्या हस्ते केले. यावेळी रवींद्र खोत, अविनाश चिकणीस, नरेश शिंगाडे, अशोक देवकुळे, वसाहत रुग्णालयाचे किशोर साळोखे, अब्रार काझी, अंकुश रेडेकर विकास पाटील, सुबोध कांबळे, चेतन काळे, गीता गुरव, अधिपरिचारिका रूपाली चव्हाण, विद्या जाधव, रुदा काळे, दीपाली फोंडे, कलेरा चोपडे, विकास शिरसे, मंगल चव्हाण, परिसेविका ज्योती बनसोडे, डॉ. दीपाली माने, डॉ. बीना रुईकर, डॉ. आशिष काळे, डॉ. देवेंद्र थोरात, डॉ. वर्षा खडे, डॉ. संपत सावंत, डॉ. हेर्लेकर, डॉ. प्रदीप सुतार, डॉ. राजदीप, डॉ. स्मिता बचाटे, औषध निर्माण अधिकारी गोरखनाथ खाडे, अमोल यादव, कर्मचारी उपस्थित होते.

Hello Kolhapur
Page No. 5 Mar 25, 2025
Powered by: erelego.com



पुण्य नगरी

**'केमिस्ट' विजेते, 'स्मॅक'ला उपविजेतेपद**

**टोप** : रोटरी क्लब कोल्हापूर सेंट्रल यांच्या वतीने आयोजित हार्मनी रोटरी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत केमिस्ट असोसिएशन संघाने स्मॅक संघावर मात करून विजेतेपद मिळवले.

स्मॅक संघाचा रणजित माने मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज आणि केमिस्ट संघाचा अवधूत पाटील उत्कृष्ट गोलंदाज, तर देवेंद्र रजपूत अंतिम सामन्यातील सामनावीर ठरला. माजी प्रांतपाल राजूभाई दोशी, चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे. स्मॅकचे खजानीस बदाम पाटील, संचालक शेखर कुसाळे, सेंट्रलचे अध्यक्ष संजय भगत, इव्हेंट चेअरमन अभिजित भोसले, को-चेअरमन नीलेश पाटील यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धेमध्ये निमंत्रित १२ संघांनी सहभाग घेतला होता. सूत्रसंचालन संदीप साळोखे यांनी केले.

यावेळी क्लब सेक्रेटरी रवींद्र खोत, विनोद कांबोज, आर. वाय. पाटील, संजय कदम, डॉ. महादेव नरके, रविराज शिंदे, संजय साळोखे आदी उपस्थित होते.

Kolhapur Edition
Mar 24, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com



















उमेद मायेचं घर या अनाथ, वीटभट्टी कामगार मुले तसेच विविध सामाजिक उपक्रमात कार्यरत असणाऱ्या संस्थेला महाराष्ट्राची शौर्यगाथा या कार्यक्रमातील निधीतून रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल कडून आर्थिक मदत देण्यात आली. यावेळी क्लब प्रेसिडेंट संजय भगत, सेक्रेटरी रवी खोत, शैलेश देशपांडे, संजय कदम, आर. वाय.पाटील, कम्युनिटी डायरेक्टर डॉ .महादेव नरके.






Blood Donation Camp On March 30th, on the occasion of Gudi Padwa, the Rotary Club of Kolhapur Central, in collaboration with Shiv Pratishthan, Karande Mala, Tarabai Park, Kolhapur, organized a blood donation camp. A total of 51 donors fulfilled their duty by donating blood during this camp The Rotary Club of Kolhapur Central extends its heartfelt gratitude to all the blood donors and the members of the organizing committee for their support and participation.

**BOD Meeting** – March 2025 The BOD meeting for March 2025 was held on March 31 at 9:30 AM at Government Press, Tarabai Park. The agenda for the meeting was as follows: 1) Review of Previous BOD Meeting The topics discussed in the previous BOD meeting were reviewed and read aloud. 2) Updates on March Projects March 2 – "Maharashtra’s Glorious Legacy" Cultural Program - The event was held at Cyber College, Anand Bhavan Hall at 5:00 PM. - The program showcased Maharashtra’s traditional folk art and dance performances. - People from all sectors of society were invited to attend. - The funds raised through donations were distributed to beneficiaries during the event. - Sponsors: - Gold Sponsor: Electronica Finance - Silver Sponsor: Union Bank - Co-Sponsors: The Kolhapur Urban Bank Ltd. and Sakarni Gypsum Community Support Initiatives: - A clean drinking water machine was donated to Sub-District Hospital, Gandhinagar, funded by Rtn.Avinash Chikanis, who contributed 15,000. -25,000 worth of food grains were donated to Bal Kalyan Sankul. - A financial donation of 15,000 was made to Umed Mayecha Ghar organization. - 10,000 was provided as aid to Snake Rescuer Prakash Gaikwad. - The event successfully raised a total fund of 3,82,850, thanks to the efforts of Event Chairman Rtn. R. Y. Patil and all Rotary Central Club members. 3) March 8 – International Women’s Day - On March 10, Dr. Deepa Phirke delivered a presentation on cancer prevention, offering valuable guidance. - The event saw a large attendance of Rotary Central members and Anns. 4) Birthday Celebrations - March 12: Rtn.R. Y. Patil was felicitated on his 50th birthday. - March 14: Birthday wishes were extended to Rtn.Chandrakant Thorat and Rtn.Rahul Mane. 5) March 16 – Women Empowerment Workshop - A handicraft and sewing training program for women was organized in

collaboration with Tanishka Platform of Sakal Media Group at Ghunkhi, Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur. - Over 100 women participated in the workshop. - The training was conducted by Smita Khamkar from Sanskar Rashidori. 6) March 17 – Joint Weekly Meeting - A joint weekly meeting was held with Rotary Club of Smart City. - The discussion focused on organizing larger events and projects through global grants. - A joint committee was decided to be formed, comprising members from both clubs. 7) March 21–23 – Harmony Rotary Premier League Cricket Tournament - The Rotary Club of Kolhapur Central hosted the Harmony Rotary Premier League Cricket Tournament. - 12 teams from various professional associations in Kolhapur participated. - Title Sponsorship was undertaken by Senior Rotary Central Member Rtn.Dajiba Patil. - Final Match: - Winner: Chemist Association - Runner-up: Smack Team - The event was successfully organized thanks to the efforts of Event Chairman Rtn.Abhijit Bhosale, Co-Chairman Rtn.Nilesh Patil, and all Rotary Central members. 8) March 30 – Blood Donation Camp for Gudi Padwa - Rotary Club of Kolhapur Central, in association with Shiv Pratishthan, Karande Mala, Tarabai Park, organized a blood donation camp on the occasion of Gudi Padwa. - A total of 51 donors contributed to this noble cause. - Heartfelt gratitude to all blood donors and Shiv Pratishthan members. The meeting was concluded with appreciation for the efforts of all members.





स्थापना : १३ जुलै, १९४९ || वंचितानाम् सुखबोधाय || नोंदणी क्रमांक : ई-८

**जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना, कोल्हापूर**

१९२४ अ/३, बी वॉर्ड, मंगळवार पेठ, बालकल्याण संकुल, कोल्हापूर – ४१६ ०१२
फोन : (०२३१) मा. कार्यवाह : २६२५४२९ E-mail : balvikaskop@gmail.com

संदर्भ क्र. : 32८ /जिपअसंको/2024-25 दि. 24 MAR 2025

प्रति,
मा. अध्यक्षसो,
रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल
कोल्हापूर

महोदय,

आपणास ज्ञात आहेच, जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना, बालकल्याण संकुल कोल्हापूर ही संस्था गेली ७० वर्षे समाजातील अनाथ, निराधार मुलामुलींचे शिक्षण, संगोपन व पुनर्वसन करणारी सेवाभावी संस्था आहे. संस्थेचे कार्य समाजातील दानशूर व्यक्ती, संस्था, संघटना यांचे मदतीवर चालते आहे.

ही संस्था करत असलेल्या संगोपन, शिक्षण व पुनर्वसन कार्यास मदत व्हावी म्हणून आपण या संस्थेस सामाजिक प्रखर जाणिवेने आपल्या रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल, कोल्हापूर मार्फत रू. २४,६००/– (अक्षरी रू. चोवीस हजार सहाशे रू फक्त) ची वस्तूरूप देणगी देवून उपकृत केलात त्याबद्दल संस्था आपली शतश: ऋणी आहे.

भविष्यातही आपल्याकडून अशा प्रकारचे सामाजिक कार्य होवो ही सदिच्छा!

आपली,
(श्रीम. पद्मजा तिवले)
**मानद कार्यवाह**
जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना
कोल्हापूर

सोबत
पा. क ७०२ रू. २४,६००/–

पदाधिकारी
अध्यक्ष (पदसिद्ध): मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर
कार्याध्यक्ष (पदसिद्ध): मा. पोलीस अधिक्षक, कोल्हापूर
उपाध्यक्ष: मा. डॉ. प्रतापसिंह जाधव, मा. व्ही. बी. पाटील
मानद खजिनदार: मा. निरंजन च. वायचळ
मानद कार्यवाह: मा. श्रीमती पद्मजा तिवले
मानद सहकार्यवाह: मा. श्री. एस. एन. पाटील
शासननियुक्त सचिव (पदसिद्ध): अधिक्षक : सर्वपल्ली राधाकृष्णन् निरीक्षणगृह / बालगृह
पदसिद्ध सदस्य: मा. आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका; मा. मुख्याधिकारी, जिल्हा परिषद; मा. जिल्हा शल्य चिकित्सक; मा. अध्यक्षीय अधिकारी, बाल न्याय मंडळ; मा. अध्यक्ष, बाल कल्याण समिती; मा. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी; मा. कार्यकारी अभियंत, सा. बां. विभाग
संस्था सदस्य: मा. महापौर, कोल्हापूर महानगरपालिका; मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद; मा. अध्यक्ष, रोटरी क्लब; मा. अध्यक्ष, शेतकरी सह. संघ. लि.; मा. अध्यक्ष, ओम श्री लक्ष्मीनारायण बालमुकुंद शां. कृ. पंत वालावलकर कापड दुकान ट्रस्ट
नियुक्त सदस्य: मा. सुरेश शिपूरकर; मा. शिवाजीराव कदम; मा. प्रदीपभाई कापडिया; मा. व्यंकाप्पा भोसले; मा. कुलदीप कामत; मा. सौ. नंदिनी पटोडिया; मा. डॉ. वैशाली नरेंद्र नानिवडेकर; ॲड. महादेवराव आडगुळे; ॲड. शैला टोपकर; श्री. उत्तम पाटील

* सल्लागार *
मा. डॉ. उल्हास दामले मा. डॉ. मोहन पाटील मा. पवन खेबूडकर मा. आर्कि. बलराम महाजन

संस्थेला दिलेल्या देणग्या ८० जी अंतर्गत आयकरात सूट मिळण्यास पात्र आहेत.

## बोधकथा...

गुरु ना एका माणसाने विचारले माझे कामगार माझ्याशी प्रामाणिक नाहीत. पत्नी, मुलं, सगळं जग हे स्वार्थी आहे. सगळे चुकीचेच वागतात. अस का?

...तेव्हा गुरु हसले आणि त्यांनी एक गोष्ट सांगितली.

एका गावात एक खोली होती. त्या खोलीत १००० आरसे होते. त्यात खोलीत एक छोटी मुलगी खेळायला जायची. अर्थातच तिला तिच्या भोवती अनेक मुली दिसायच्या. ती खुश व्हायची. ती हसली की त्या सगळ्या हसायच्या. तिने टाळ्या वाजवल्या की त्या सगळ्या टाळ्या वाजवायच्या. त्यामुळे तिला ती खोली म्हणजे सर्वोत्तम जागा वाटायची.त्याच खोलीत एकदा एक खूप त्रासलेला, एकदम नाराज माणूस शिरला. त्याला त्याच्या भोवती सगळे चिडलेले, नाराज ,अस्वस्थ चेहरे दिसायला लागले. ते सगळे त्याच्याकडे रोखून पहात होते. त्याने एकदम भडकून त्यांच्यावर हात उगारला तर त्या सगळ्यांनी ही त्याच्यावर हात उगारला. त्याच्या मनात विचार आला अरेच्या काय ही खोली. जगात यापेक्षा वाईट जागा नसेल.हे जग म्हणजे अशाच हजारो आराशांची मोठी खोली आहे.आपण जसे असू तसे त्या आरशातून दिसू. जग म्हणजे स्वर्ग की नरक हे आपल्यावर अवलंबून आहे. आपण जसं पाहू तसं ते दिसेल.

आपन जे विचार करतो तसेच आपल्या जीवनात घडते.आपण जे पेरतो तेच ऊगवते हा निसर्गाचा नियम आहे.

ओम साई






बाल कल्याण संकुल येथे रोटरी क्लब ऑफ कोल्हापुर सेंट्रल यांच्यावतीने महाराष्ट्राची गौरवगाथा या कार्यक्रमाच्या माध्यमातून मिळालेल्या फंड मधून २५०००.०० चे धान्य देण्यात आले.यावेळी प्रेसिडेंट संजय भगत ,डॉ.महादेव नरके सर,सेक्रेटरी रवींद्र खोत,डॉ.अभिजित माने सर ,नरेश शिंगाडे उपस्थित होते.



All the best Khushi

झाले आहे की विद्यार्थी



जसजसे आपण उंच जाऊ लागतो तसतसे क्षितिज खूप मोठे दिसू लागते. आणि ते नवे क्षितिज आपल्याला खुणावू लागते. कोल्हापुरातील खुशी विनोद कांबोज या गिर्यारोहक तरुणीच्या वाट्यालाही असेच मोठे क्षितिज आले आहे. कोल्हापुरात जोतिबा डोंगर, पन्हाळ्याचा बुरुज, विशाळगडची अभेद्य भिंत असे टप्पे पार करत करत ती एव्हरेस्टच्या बेस कॅम्प पर्यंत पोहोचली. आणि त्यापुढे आता तिच्या या कर्तृत्वावर तिला कॅलिफोर्नियात संधी मिळाली आहे. कॅम्प ऑगस्ट या ख्यातनाम संस्थेत आउटडोर इन्स्ट्रक्टर म्हणून ती सेवा देणार आहे. सह्याद्रीच्या दगड धोंड्यातून वाट काढणाऱ्या या गिर्यारोहक तरुणीला ही एक नवी संधी मिळाली आहे.

सुधाकर काशिद, कोल्हापूर

# खुशीची झेप सातासमुद्रापार...

कोल्हापुरातील खुशी कांबोज ही तरुणी म्हणजे कायम दगड धोंडे डोंगरदऱ्यात वावरणारी मुलगी. वडील विनोद कांबोज हे कोल्हापुरातील अनुभवी गिर्यारोहक. पहिल्या पहिल्यांदा म्हणजे ३०–३५ वर्षांपूर्वी पन्हाळा ते विशाळगडची पावनखिंड या मोहिमेत ते अग्रभागी. अवघ्या सात ते आठ सहकाऱ्यांसह दरवर्षी ते ही मोहीम आयोजित करायचे. आणि केवळ तरुणच नव्हे तर ज्येष्ठांनाही जंगल भ्रमंतीचा वेगळा आनंद मिळवून द्यायचे. आता आपण थकलोय या भावनेने घरातच बसून राहणाऱ्या ज्येष्ठातही त्यांनी दऱ्याखोऱ्यात फिरण्याची आवड निर्माण केली आणि कोल्हापुरात एक दुर्ग भ्रमंतीची चळवळच उभी राहिली. त्यांच्यासारख्या अन्य संस्था, संघटना, त्यांच्या मित्रांनी त्यात सतत भर टाकली आणि कोल्हापूरची दुर्ग भ्रमंती ही एक कोल्हापूरच्या साहसी खेळाची नवी ओळख तयार झाली.

या विनोद कंबोज यांची कन्या म्हणजे खुशी. वडिलांच्या सोबत ती कायम राहिली. अशा दुर्ग भ्रमंतीत पोरींनी असं रानावनात सारखं फिरू नये असा सल्लाही तिला काही जणांच्या कडून मिळायचा. पण खुशी कायम आपल्या आवडत्या छंदाच्या खुशीतच राहिली. पण केवळ आपल्या आवाक्यातले डोंगर दरी पार करणे म्हणजे दुर्ग चढाई नव्हे, तर त्याला शास्त्रीय आधाराची नव्या साधनांची जोड दिली तर ती चढाई आणखी चांगली होऊ शकते हे ओळखून खुशीला गिर्यारोहणाचे शास्त्रशुद्ध शिक्षण दिले गेले. अशक्य वाटणारे कडे पार करणे त्यामुळे शक्य होऊ लागले. कोकणकडा म्हणजे अनुभवी गिर्यारोहकांनाही अजून आव्हान वाटते. पण खुशीने कोकणकडा पार केला. एवढेच नव्हे तर या मोहिमेत अंधार झाल्याने अर्ध्या कड्यावर रात्रभर थांबून तिने आपल्या साहसाचे दर्शन घडवले. प्रत्येक गिर्यारोहकाला एव्हरेस्ट खुणावत असे. तो खुशीलाही तो खुणावत राहिला. तिने एव्हरेस्ट बेस कॅम्प पर्यंत मजल मारली.

ती अवघ्या २२ वर्षांची आहे. त्यातली बारा वर्षे ती गिर्यारोहणात आहे. या कालावधीत गेल्या वर्षी तिला मोठ्या दुर्घटनेलाही सामोरे जावे लागले. मनाली येथे ती पडली आणि पोटाला इजा झाली. इजा खूप गंभीर होती. सव्वा महिना ती आयसीयूत होती. वडील विनोद, आई संगीता यांची अवस्था सांगण्यापलीकडची होती. पण त्यातून ती बरी झाली. आणि पुन्हा काही दिवसांनी कमरेला दोर बांधून डोंगरदऱ्यात चढाई करू लागली. तिने हे करताना कधीही अभ्यासाकडे दुर्लक्ष केले नाही. कायम ९० टक्केच्या आसपास गुण मिळवत गेली. एमबीए झाली आणि कॅलिफोर्नियात तिची निवड झाली आहे. या नोकरीत तिला मोठे क्षितिज मिळाले आहे आणि ही दुर्गप्रेमी कन्या साता समुद्रापार पोहोचली आहे.

**दुरुन डोंगर साजरे : खुशी कांबोज**

गिर्यारोहण खूप आव्हानात्मक आहे दुरून डोंगर साजरे असे आपण म्हणतो ते खरे आहे. कारण जवळ गेल्यानंतर या डोंगरातील खाच खळगे आणि आव्हाने दिसू लागतात. पण मला ही आव्हानेच नेहमी साद घालतात. कोल्हापूरचा परिसर डोंगरदऱ्यांचा आहे. त्यामुळे मी विशाळगड, पन्हाळा, गगनबावडा या परिसरात पहिल्यांदा गड किल्ल्यावर पाऊल ठेवले आणि आता मी कॅलिफोर्नियात त्याच अनुभवावर जात आहे.

Rotary club of Kolhapur Central 2024-25

NOTICE

2nd Club Assembly and March.25 Close Meeting of year 2024-25

*Notice is hereby given to all the members of Rotary club of Kolhapur central 2024-25*

*2 nd club assembly & Mar. 25 Close Meeting of Rotary club of Kolhapur central 2024-25 will be held on Monday,31st March 2025. At 7:00 pm. In presence of AG Rtn.Rahul Kulkarni*

*All members are requested to be present on time*

*Agenda :*

*1) Mar. 25 Month Working Presentation*

*2) (AG )Planning of remaning year --2024-25*

*3) RPL Disscussion*

*3) Completed project and Action taken report if any*

*4)Treasurer report till*

*5)Any other matters with the permission of the chair*

*6) To consider matters from members, if any*

*Venue: Rotary club of kolhapur central's Rtn Motibhai Doshi Memorial hall, near district court, 1st floor, Swayam Shcool kolhapur*

*Time : 7:00 pm. Sharp*

*Note: if there is no quorum at the scheduled time, the meeting shall be adjourned and be reconvened at 7:30 pm. at the same venue, with the same agenda where quorum will not be necessary.*

| | | |
|---|---|---|
| *Rtn.Sanjay Bhagat* | *Rtn. Ravindra Khot* | *Rtn.Nilesh Patil* |
| *President* | *secretary* | *Treasurer* |






